महाराष्ट्र शासन

इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था

(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

महाज्योती — ज्ञानदीप समतेचा —

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022

दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com


**जा.क्र.** महाज्योती, नागपूर/ आस्था/ 581 /2022-23, **दिनांक** :- 11/08/2022

## परिपत्रक

विषय :- UPSC प्रशिक्षणासाठी घेण्यात आलेल्या प्रवेश चाचणीचा निकाल व तात्पुरती निवड झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर मार्फत UPSC प्रशिक्षणासाठी अर्ज मागविण्यात आलेले होते, त्यानुषंगाने प्रशिक्षण प्रवेशासाठी दि.12/07/2022 रोजी छाननी परीक्षा घेण्यात आलेली होती.

दि.03/08/2022 रोजी सर्व उमेदवारांच्या नोंदणी क्रमांकवार तसेच प्राप्त गुणवार निकालाच्या याद्या प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. सदर प्राप्त गुण, मुळ जाहिरात व योजनेच्या तपशीलात नमुद पात्रतेचे निकष, सामाजिक प्रवर्गनिहाय मंजुर उमेदवारांची संख्या या आधारावर प्रशिक्षणार्थींच्या प्रवर्गनिहाय (इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग) तात्पुरत्या निवड याद्या (Provisional Selection List) या सोबत प्रसिध्द करण्यात येत आहेत.

सदरच्या याद्या नोंदणीकृत उमेदवारांनी सादर केलेल्या वैयक्तिक माहिती व प्राप्त आवश्यक माहितीच्या आधारावर तयार करण्यात आल्या आहेत. असे असले तरी तात्पुरत्या निवड झालेल्या सर्व उमेदवारांनी त्यांचेकडील पुढील मुळ प्रमाणपत्रे, दस्तएवेज तपासणीसाठी व अंतीम निवड करण्यासाठी तयार ठेवावेत. सदर तपासणीचे स्थळ व दिनांक यथावकाश कळविण्यात येतील.

1. Caste Certificate
2. Aadhar Card
3. 10 Marksheet Certificate
4. 12 Marksheet Certificate
5. Graduation Marksheet Certificate
6. Non - Creamy Layer Certificate
7. Domicile Certificate
8. T.C of 10th Class

या शिवाय कोणत्याही माध्यमातुन उमेदवारांनी सदर केलेली माहिती चुकीची दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्यास किंवा या पूर्वी सदर योजनेचा लाभ घेतल्याचे आढळल्यास तसेच सारथी संस्थेच्या निवडयादीत समावेश असल्याचे आढळल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर